# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/१०/२०१६

**१) शेतातील सागवन झाडाची चोरी. :–**

दिनांक ०२/०६/२०१६ रोजी १०.०० वा. पुर्वी यातील आरोपीने फिर्यादीचे शेतातील शिवधुऱ्या वरील सागवनचा झाड कापुन कि. १०.०००/–रू. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी वसंतराव बुधाजी बावनकर वय ७४ वर्ष. रा. धाबेटेकळी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) एसटी बस मधुन तिकीट बॅगची चोरी. :–**

दिनांक २५/१०/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. ज्योती गोविंदा मुस्कावाळ वय २९ वर्ष रा. गणेशपुर भंडारा ही एसटी वाहक या नौकरीला असुन फिर्यादीने भंडारा ते सनफ्लॅगची फेरी करतांना तिकीटाचा ट्रे बसचे कॅबीन मध्ये ठेवले असता एसटी बस स्थानकावर ऊभी ठेवुन बाहेर गेली. त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे तिकीटाची बॅग कि. ९,९८८/–रू. ची चोरून नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) सासुने सुनेस शिवीगाळ करून मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली :–**

दिनांक २४/१०/२०१६ रोजी ००.१९ वा. दर. यातील फिर्यादीचे सासुने फिर्यादी सोबत झगडा भांडण करून लगेच आरोपी हीला सोबत घेवुन आली असता यातील आरोपी क्र. १ ने फिर्यादी घरात असतांना घरात येवुन मी तुझ्या नवऱ्या सोबत आहे का असे म्हणुन फिर्यादीचे केस पकडुन जमीनीवर व भिंतीवर डोके आपटुण जखमी केले. तसेच आरोपी क्र. २ ते ४ हे सुद्धा घरात येवुन फिर्यादीस हाताने मारपिट करूण शिविगाळ केली व जिवाणे मारण्याची धमकी दिल्याने असे फिर्यादी सौ. सविता जागेश्वर बावणकर वय २७ वर्ष रा. वाही यांचे तोंडी व डॉक्टर रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,४५२,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक २५/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, गोबरवाही, साकोली व पवनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ३५ लिटर हातभट्टी + सडवा कि. ७,२५०/–रू. तसेच ८ लिटर १०० मिली देशी दारु कि. १,७५०/–रु. चा असा एकुण कि. ९,०००/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

26/10/16

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.